स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६**

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/शै.वि-५/संकीर्ण/२०२४/ 299 दिनांक : 23 JAN 2024

## परिपत्रक

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/
अशासकीय अनुदानित संस्था. (पुणे विभाग).

प्रति,
उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय, पुणे

**विषय :- राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. भारत निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. ४९१/ECI/LETFUNC/SVEEP-१/NVD/२०२३ दि. ८ जानेवारू २०२४.
२. मा. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण २०२३/पत्र क्र.७४५/२२/३३ दि. ११.०१.२०२४.
३. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (निवडणूक शाखा) यांचेकडील पत्र क्र. पीईई-३/कावि/५८/२०२४ दि.१६.०१.२०२४.
४. मा. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. उभूसंक्र.१३/आस्था-१/कावि/७/२०२३ दि. १७.०१.२०२४.
५. संचालनालयाचे पत्र क्र. १६/संकीर्ण/मतदान (शपथ)/२०२३-२४/०८ दि. १९.०१.२०२४.

उपरोक्त विषयाबाबत मा. निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील दिनांक ११.०१.२०२४ रोजीची प्रत या सोबत जोडणेत आलेली आहे. त्याचे अवलोकन करण्यात यावे.

दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येणार आहे. राष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून या दिवशी सर्व मतदारांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ दिली जाते. त्यानुसार पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्याक्रमाच्या शासकीय, अशासकीय अनुदानित संस्थेतील **सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी शपथ घेण्याचा कार्यक्रम दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात यावा. राष्ट्रीय मतदार दिवसांची इंग्रजी, हिंदी व मराठी शपथेचा नमूना सदर पत्रासोबत जोडण्यात आलेला आहे.**

**तसेच राष्ट्रीय मतदार दिवसाची शपथ घेतलेबाबतचा फोटोसह अनुपालन अहवाल** info.dteropune@gmail.com **या ईमेल आयडीवर दिनांक २९.०१.२०२४ रोजीपर्यंत न-चुकता या कार्यालयास सादर करावा.**

सोबत : सहपत्र.

**(डॉ.द.व्यं.जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे कार्यालय**
**जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बि विंग, पुणे - १**

**इमेल आयडी - slaopune१३@gmail.com**

**क्र.उभूसंक्र. १३/आस्था -१ /कावि/८१ /२०२३** **दिनांक - १७/ १ /२०२४**

**प्रति ,**

**सर्व कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख**
---------------------------------
---------------------------------

**विषयः- राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करण्याबाबत.**

**संदर्भः-** १. मा.भारत निवडणूक आयोगाकडील पत्र क्र.४९१/ECI/LETFUNC/SVEEP-१/NVD/२०२३ दि.८ जानेवारी २०२४

२.मा. मुख्य निवडणुक अधिकारी कार्यालय,महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण २०२३ /पत्र क्र. ७४५/२२/३३ दि. ११/०१/२०२४

३.जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ( निवडणूक शाखा ) यांचेकडील पत्र क्र.पीईई-३/कावि/५८/२०२४ दि.१६/१/२०२४

उपरोक्त विषयाबाबत मा. मुख्य निवडणूक अधिकारी ,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील दिनांक ११/१/२०२४ रोजीची प्रत यासोबत जोडणेत आलेली आहे. त्याचे अवलोकन करणेत यावे.

दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने १८ वर्षे पूर्ण केलेल्या नव तरुण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा मुख्य उद्येश आहे.

राष्ट्रीय मतदार दिनाचं औचित्य साधून या दिवशी सर्व मतदारांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ दिली जाते. त्यानुसार सर्व शासकीय कार्यालयामध्ये सर्व अधिकारी /कर्मचारी यांचेसाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११ .०० वाजता आयोजित करण्यात यावा, असे निर्देश दिलेले आहेत. राष्ट्रीय मतदार दिवसांची इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेमध्ये घ्यावयाच्या शपथेचा नमूना सदर पत्रासोबत जोडण्यात आला आहे.

उपरोक्त प्रमाणे राष्ट्रीय मतदार दिवसाची शपथ घेतलेबाबतचा फोटोसह अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा ही विनंती

( अर्चना जाधव -तांबे )
उपजिल्हाधिकारी
तथा स्वीप नोडल अधिकारी, पुणे

प्रत :- १. मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य , मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२.मा.उपजिल्हा निवडणुक अधिकारी, पुणे यांना माहितीस्तव.

# मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.७४५/२२/३३.
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.
दि. ११ जानेवारी, २०२४.

प्रति,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

**विषय :- राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम, २०२४ राबविणेबाबत.**

संदर्भ :- भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४९१/ECI/LET/FUNC/SVEEP-I/ २०२३, दि.८.१.२०२४.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भाधिन भारत निवडणूक आयोगाच्या दि.८.१.२०२४ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडून पाठवित आहे.

२. दि.२५ जानेवारी, २०२४ रोजी १४ वा राष्ट्रीय मतदार दिवस राज्यस्तर, जिल्हास्तर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करावयाचा आहे. सदर १४ व्या राष्ट्रीय मतदार दिवसासाठी 'Nothing like voting, I vote for sure' हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आला आहे.

३. भारत निवडणूक आयोगाने राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम साजरा करण्याकरिता सर्वसमावेशक प्रचार प्रसाराचा आराखडा, जिल्हास्तरीय आयकॉन व्यक्तींचा समावेश, विविध संस्थेशी भागीदारी व सहयोग, समाज माध्यमांमार्फत राबविण्यात यावे विविध उपक्रम यासंदर्भात सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. तसेच भारत निवडणूक आयोगाने मतदान केंद्र स्तर व जिल्हा स्तरावर राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम साजरा करताना करावयाच्या सविस्तर सूचना दिल्या आहेत. यानुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या संदर्भाधिन पत्रात नमूद केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन १४ वा राष्ट्रीय मतदार दिवस जिल्हास्तरावर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(शरद दळवी)
अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत :- उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

12 JAN 2024

1723

DEO level arrange

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १६/संकीर्ण/ मतदान (शपथ)/२०२३-२४/ ०८ दिनांक: 19 JAN 2024

प्रति,

१) मा. सहसंचालक,
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर

२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ, मुबई

विषय :- राष्ट्रीय मतदार दिन म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करण्याबाबत..

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग जा.क्र. संकिर्ण-२०२३/प्र.क्र. ७४५/२३/३३, दिनांक ११.०१.२०२४
२) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२४/सं.क्र. ०२/ समन्वय कक्ष, दि. १८.०१.२०२४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून सर्व मतदारांना लोकशाही निष्ठा ठेवण्याची शपथ दिली जाते. त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/ अशासकीय कार्यालये व संस्थामध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी आयोजित करण्यात यावा.

तसेच राष्ट्रीय मतदार दिनाच्या दिवशी इंग्रजी, हिन्दी व मराठी भाषामध्ये घ्यावयाच्या शपथपत्राचा नमूना सोबत जोडण्यात आला आहे, व सदरचा नमूना तंत्रशिक्षण संचालनालयातील कार्यासन क्र. १६ च्या ई-मेल desk१६@dtemaharashtra.gov.in वर पाठविण्यात आलेला आहे. त्यानुसार आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. सुनिल भामरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई.

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
तंत्रशिक्षण संचालनालयातील सर्व कार्यासने

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@ gov.in
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१

दिनांक- १८.०१.२०२४.

क्र.संकीर्ण-२०२४/सं.क्र.०२/समन्वय कक्ष

प्रति,

१. कक्ष अधिकारी (आस्था-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, (ग्रंथालय), ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
५. संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय-** राष्ट्रीय मतदार दिन म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करण्याबाबत.

**संदर्भ-** सामान्य प्रशासन विभाग जा.क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७४५/२३/३३ दिनांक ११.०१.२०२४ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त पत्रामध्ये "राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून सर्व मतदारांना लोकशाही निष्ठा ठेवण्याची शपथ दिली जाते. त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सर्व अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात यावा. राष्ट्रीय मतदार दिनाच्या दिवशी इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेमध्ये घ्यावयाच्या शपथपत्राचा नमूना सोबत जोडण्यात आला आहे." असे नमूद केले आहे.

त्यानुसार आपल्या स्तरावर नियमित कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला

(विशाल वि. ताठे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

राष्ट्रीय मतदार दिन म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची ...

...all | ˅ Delete Junk | ˅ ...

# ...य मतदार दिन म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा ...ण्याबाबत.

प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. २०७ दि. ९/१/...

Reply all | ˅

CEO Maharashtra <ceo_maharashtra@eci.gov.in>

Thu 1/11/2024 2:54 PM

To: Dr. Nitin Kareer

Cc: Anoop Kumar; Pravin Darade; Abha Shukla; Vikas Chandra Rastogi; Vandana Krishna; SECRETARY (FCS&CP); Principal Secretary PHD; Milind mhaiskar; Deepak Kapoor, ACS (WRD); Dr, Sanjay Belsare, Secretary (CAD); Dr. Sanjay Belsare, Secretary (PC); psec industries <psec.industries@maharashtra.gov.in>; Parrag Jaiin Nainutia; sumantbhange; marathi basha; Vikas Kharage; Vinita Ved Singal; Mrs. Suvarna Keole; Shri. Satish B. Waghole; sec mededu <sec.mededu@maharashtra.gov.in>; Jayshree Mukherjee; MANISHA PATANKAR-MHAISKAR; MANISHA PATANKAR-MHAISKAR; Sanjay Dashpute; Shri Eknath Dawale; Ashish Kumar Singh, IAS; Virendra Singh; TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT

Inbox

To help protect your privacy, some content in this message has been blocked. To re-enable the blocked features, click here.

To always show content from this sender, click here.

CR-745- NVD.pdf
1 MB

Download

Sir/Madam,

Please find attached for necessary action.

With Regards,
**Office of the CEO, Maharashtra**

डॉ. नितिन करीर
मुख्य सचिव

क्र.:-संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७४५/२३/३३
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय
(विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई -४०० ०३२.
दिनांक:-११ जानेवारी, २०२४

विषय :- राष्ट्रीय मतदार दिन म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करण्याबाबत.

प्रिय श्री. / श्रीम.

दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी "राष्ट्रीय मतदार दिन" साजरा करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने १८ वर्ष पूर्ण केलेल्या नवतरुण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा मुख्य उद्देश आहे.

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून या दिवशी सर्व मतदारांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ दिली जाते. त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सर्व अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम दि. २५ जानेवारी, २०२४ रोजी आयोजित करण्यात यावा. राष्ट्रीय मतदार दिनाच्या दिवशी इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेमध्ये घ्यावयाच्या शपथेचा नमूना सोबत जोडण्यात आला आहे.

आपला स्नेहांकित,

(डॉ. नितिन करीर)

सोबत :- वरीलप्रमाणे.

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व)
२. विभागीय आयुक्त (महसूल) (सर्व)
३. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

# राष्ट्रीय मतदार दिवस
## मतदारांसाठी प्रतिज्ञा

### मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु."

### हिंदी

"हम, भारत के नागरिक, लोकतंत्र मे. अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते हैं की हम अपने देश की लोकतांत्रिक परम्पराओंकी मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनो में अपने मताधिकार का प्रयोग करेंगे."

### English

**"We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections, and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, Community language or any inducement."**

******************